**-: प्रेसनोट दिनांक - 12/11/2019 :-**

**प्रविणकुमार बाळासाहेब तोडकर, वय 41, तलाठी - सजा शहापूर, ता. हातकणंगले, वर्ग - 3, रा. श्री. माणिक थोरात यांचे घरी भाडयाने, दत्त कॉलनी, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, यांचेसाठी खाजगी उमेदवार सिध्दगोंडा लक्ष्मण डंगे, वय 36, रा. चावडीचे मागे, पाण्याचे टाकीजवळ, शहापूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर याने लाच मागणी करुन लाच स्विकारलेबाबत.......**

---

तक्रारदार यांचे मित्र नोकरी निमित्त पुणे येथे राहात असुन त्यांनी शहापूर येथे प्लॉट खरेदी केला आहे. परंतू त्यांचे प्लॉटचे मालकी हक्कात 7/12 पत्रकी अद्याप त्यांचे नाव नोंद नाही. त्यांना नोकरीतून सवड मिळत नसलेने त्यांचे प्लॉटला नाव लावून घेणेस सांगून त्याबाबत त्यांनी तक्रारदार यांना तसे संमत्तीपत्र दिले आहे. त्यानुसार तक्रारदार यांनी शहापूर तलाठी कार्यालयात तलाठी तोडकर यांची भेट घेवुन त्यांचे मित्राचे कामाबाबत विचारणा केली असता, त्यांनी तक्रारदार यांना त्यांचेकडे काम करणारा खाजगी इसम सिध्दू डंगे याला भेटणेस सांगितले. त्यानंतर तक्रारदार हे खाजगी उमेदवार सिध्दू डंगे यांला भेटुन त्यांचे मित्राचे कामाबाबत विचारले, तेव्हा सिध्दू डंगे हे तलाठी यांना भेटले व तक्रारदार यांचेकडे येवून त्यांनी तक्रारदार यांना तुझ्या मित्राचे काम फार जुने आहे. त्यासाठी तलाठी साहेबांना 10,000 रुपये द्यावे लागतील, मगच तुझे मित्राचे प्लॉटचे 7/12 पत्रकी नाव लावून मिळेल असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार दिनांक 11/11/2019 रोजी तलाठी कार्यालय, शहापूर येथे त्यांचे मित्राने खरेदी केले प्लॉटचे 7/12 पत्रकी नाव लावणेचे कामाचे काय झाले? याची चौकशी करणेसाठी गेले होते. त्यावेळी तक्रारदार यांनी खाजगी उमेदवार सिध्दू यास 10,000/- रक्कम जास्त होते, काहीतरी कमी करा असे सांगितले असता, खाजगी उमेदवार सिध्दू याने तलाठी तोडकर यांना जयसिंगपूर येथे त्यांचे घरी जावून भेटूया, त्यांचेशी तुम्ही पैशाविषयी बोलून घ्या असे तक्रारदार यांना सांगितले होते. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक 11/11/2019 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तलाठी तोडकर व खाजगी उमेदवार डंगे यांच्याविरुध्द तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे आम्ही शासकीय पंच व स्टाफसह आज दिनांक 12/11/2019 रोजी आरोपी नं. 1 तोडकर यांचे मुळ घरी दत्त कॉलनी, जयसिंगपूर येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये आरोपी नं. 2 यांनी सिध्दगोंडा डंगे यांनी आलोसे नं. 1 तलाठी तोडकर यांचेसाठी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मित्राने खरेदी केले प्लॉटचे 7/12 उता-यावर त्यांचे नाव लावुन नवीन 7/12 उतारा देणेसाठी रु. 8,000/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच आरोपी नं. 1 तोडकर यांचे मुळ घरी दत्त कॉलनी, जयसिंगपूर येथे घेवुन येणेस सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे लागलीच आम्ही शासकीय पंच व स्टाफसह आरोपी नं. 1 तोडकर यांचे मुळ घरी दत्त कॉलनी, जयसिंगपूर येथे सापळा कारवाईचे आयोजन केले असता, तेथे तक्रारदार, खाजगी उमेदवार डंगे व तलाठी तोडकर यांची भेट झालेवर, त्यांचेत तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा होवुन आरोपी नं. 2 डंगे यांनी आलोसे नं. 1 तलाठी तोडकर यांचेसाठी त्यांचे मित्राने खरेदी केले प्लॉटचे 7/12 उता-यावर त्यांचे नाव लावुन नवीन 7/12 उतारा देणेसाठी आलोसे नं. 1 तलाठी तोडकर यांचेसमक्ष तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कमेपैकी पहिला हफ्ता रुपये 5,000/- लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदर प्रकरणी तलाठी प्रविणकुमार तोडकर व खाजगी उमेदवार सिध्दगोंडा डंगे यांना ताब्यात घेणेत आले असून त्यांचेविरुध्द जयसिंगपूर पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा.श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोलीस हवालदार मनोज खोत, पोलीस नाईक शरद पोरे, पोलीस कॉस्टेबल रुपेश माने, मयुर देसाई व चालक पोहेकॉ. सुरज अपराध, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.**

**1)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- 1800222021**

**2)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- 020/26122134, 020/26132802, 020/26050423.**

**3)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.,कोल्हापूर मो.नं. 9011228333, कार्यालय दुरध्वनी क्रमांक - 0231/2540989.**

**4)हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- 1064. 5)व्हॉटस अप क्रमांक :- 7875333333.**